# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २८/०७/२०१८

## खुन व खुनाचा प्रयत्नाचे गुन्हयातील आरोपीतांना जन्मठेप व सक्त मजुरीची शिक्षा

---

सन २०१४ मध्ये देवळा तालुक्यातील गिरणारे शिवारात श्री. काशिनाथ काळु खैरणार यांना त्यांचे चुलत भाऊबंध यांनी शेतीचे वादावरून काठी व कु-हाडीने मारहाण करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर बाबत देवळा पोलीस ठाण्यास ६१/२०१४ भादवि कलम ३०७,५०४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपीतांना तात्काळ अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे तत्कालीन तपासी अंमलदार **पोलीस निरीक्षक श्री.बी.बी.सातपुते** यांनी गुन्हयातील आरोपींविरुध्द सबळ पुरावे गोळा करून, गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने अतिशय चिकाटीने तपास करून दिनांक ३१/०८/२०१७ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट नं. ५, नाशिक न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर खटल्यात दिनांक २७/०७/२०१८ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती घोडके मॅडम, कोर्ट नं.५, नाशिक न्यायालयाने सदर गुन्हयातील आरोपींविरुध्द तपासी अंमलदार यांनी सादर केलेल्या सबळ पुराव्यास अनुसरून आरोपी नामे **१) जिभाउ काळु खैरणार, २) अरूण जिभाउ खैरणार, रा. गिरणारे शिवार, ता. देवळा** यांना दोषी ठरवुन **०२ वर्षे सक्त मजुरी व तीन हजार रूपये दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद अशी शिक्षा** ठोठावली आहे. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्रीमती गोरे व कोर्ट पैरवी पोहवा नाईक यांनी कामकाज पाहिले.

तसेच सन २०१५ मध्ये डिसेंबर महिन्यात हरसुल पो.स्टे.हद्दीतील खुंटपाडा शिवारात सुभाष काळु गावीत (मयत) यांना आरोपी नामे रामदास आहेर व दशरथ जाधव यांनी दोरीने गळा आवळुन छाती व पोटावर मारहाण करून करून जिवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने प्रेत भाताचे आवणात फेकुन दिले म्हणुन **हरसुल पोलीस ठाणेस गुन्हा रजि.नं. ६७/२०१७ भादवि कलम ३०२,२०१,१२०(ब), ३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील निष्पन्न आरोपीतांना तात्काळ अटक करण्यात आला होती. सदर गुन्हयाचे तपास अंमलदार सहा.पोलीस निरीक्षक श्री. पी.पी.साळुंखे, हरसुल पो.स्टे. यांनी गुन्हयातील आरोपीतांविरुध्द सबळ पुरावे गोळा करून, गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने अतिशय चिकाटीने तपास करून मा. जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट नं. ४, नाशिक न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर खटल्यात दिनांक १९/०७/२०१८ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री गिमेकर सो़, कोर्ट नं.४, नाशिक न्यायालयाने सदर गुन्हयातील आरोपींविरुध्द साक्षीदारांनी दिलेली साक्ष व तपासी अंमलदार यांनी सादर केलेले सबळ पुराव्यास अनुसरून आरोपी नामे **१) रामदास पांडुरंग आहेर, २) दशरथ किसन जाधव, रा. नांदगाव कोळी, ता.त्रंबकेश्वर** यांना भादवि कलम ३०२ अन्वये दोषी ठरवुन **जन्मठेप व ५ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने कैद, भादवि कलम २०१ अन्वये ७ वर्षे सक्त मजुरी व २ हजार रूपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी शिक्षा** ठोठावली आहे. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री आर.एल. निकम व कोर्ट पैरवी पोहवा एस.जी.शिरोळे यांनी कामकाज पाहिले.

वरील दोन्ही गुन्हयांतील तपासी अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**,व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांनी अभिनंदन करून बक्षीसपत्र जाहिर केले आहे.